## प्रकरण तिसरे

## दलित आत्मचरित्रे

## प्रकरण तिसरे

## दलित आत्मचरित्रे

मराठी वाङ्मयामध्ये चरित्र-आत्मचरित्र हे दोन वाङ्मय प्रकार वेगवेगळे असले तरी ते एकमेकाच्या जवळ येण्यासारखे आहे· महत्वाचा भेद म्हणजे चरित्र हे एखादया असामान्या माणसाचे त्याच्या जवळच्या माणसाने लिहिलेले जीवनचित्र असते· तर आत्मचरित्र हे स्वतःच लेखकाने लिहिलेले असते· मराठी वाङ्मयात चरित्र वाङ्मय आत्मचरित्र वाङ्मयाच्या मानाने अधिक लिहिले आहे· आत्मचरित्राची संख्या अल्प आहे· स्वतःबद्दल वाटत असलेल्या संकोचामुळे आत्मचरित्राची संख्या कमी आहे· इंग्रजी, संस्कृतीचा संपर्क आणि इंग्रजी शिक्षण सुरू होवून अर्ध शकत झाले तरी आत्मचरित्र वाङ्मय प्रकाराला म्हणावी तशी गती मिळालेली आढळत नाही· चरित्र गावयाचे ते देवाचे, देवभक्ताचे आणि देशभक्ताचे, समाज सुधारकाचे असा या वाङ्मय प्रकाराबद्दल समज असल्यामुळे आत्मचरित्र लिहिण्याकडे प्रवृत्ती सुरुवातीच्या काळात फारसे आढळत नाही· तुकारामांचे आत्मचरित्रपर अभंग याला अपवाद म्हणावा लागेल· तटस्थ वृत्तीने कठोर आत्मपरीक्षण करणे· तसेच आत्मस्तुतीच्या दोषापासून अलिप्त रहाणे हे वैशिष्टये भारतीयांच्यामध्ये असल्यामुळे पुढील काळात स्वतःचे जीवन अनुभव प्रमाणिकपणे व्यक्त करण्याची वृत्ती बळावत जावून आत्मचरित्रपर लेखनाला प्रारंभ झाला असे अभ्यासकांचे मत या वाङ्मय प्रकाराच्या संदर्भात इष्ट वाटते·[1]

आत्मचरित्रपर वाङ्मयाचे मराठी आत्मचरित्रपर वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने इ·स· 1800 ते 1874, इ·स· 1874 ते 1920, इ·स· 1920 ते 1960, आणि इ·स· 1960 ते इ·स· 1993 असे चार कालखंड पाडता येतात· या कालखंडामध्ये अनेक स्त्रीपुरुष लेखकांनी व लेखिकांनी आपली आत्मचरित्रे लिहून आत्मचरित्रपर वाङ्मय प्रकार समृध्द केला आहे· अलिकडील काही दलित लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहून या वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली आहे·

मराठीतील आत्मचरित्रे संख्येने कमी लिहिली गेली असली तरी त्यापैकी काही आधुनिक मराठी वाङ्मयाची सुंदर भुषणे ठरली आहेत· मराठीतील पूर्वीच्या आत्मचरित्रपर वाङ्मयाकडे आपण पाहिले तर आपणास एक गोष्ट लक्षात येते की, आत्मचरित्रा संबंधी आपल्या ज्या कल्पना आहेत त्यास अनुसरून ज्यास आत्मचरित्र ग्रंथ म्हणता येईल अशा स्वरूपाची आत्मचरित्रे प्राचीन मराठी साहित्यात आपणास कोठेही वाचावयास मिळत नाही· नामदेव, तुकारामांनी आपल्या अभंगातून आपल्या जीवना संबंधी विशेषतः स्वतःला आलेल्या साक्षात्काराचे प्रसंग त्रोटक स्वरूपात वर्णिले आहे· संत बहिणाबाईंनी मात्र आपले जीवन अनुभव अधिक विस्ताराने लिहिले आहे·

पेशवे काळात नाना फडणवीसाचे आत्मचरित्र अगदी त्रोटक स्वरूपात व विशिष्ट प्रसंगापुरते मर्यादित असे लिहिले आहे· तथापी ते छोटेसे आत्मचरित्र नानांच्या उत्कृष्ट लेखन शैलीची साक्ष पटविते· विशेषता त्यांनी आपल्या स्वाभाविक दोषांचा मोकळेपणाने उल्लेख केले आहे· पेशवाईच्या अखेरच्या काळातील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांनी लिहिलेले आत्मचरित्रही असेच आहे· विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी आपल्या "वेदोक्त" धर्मप्रकाश §1859§ या ग्रंथात दिलेले आत्मनिवेदनपर वृत्तांत तसेच प्रसिध्द क्रांतीवीर वासुदेव बळवंत यांनी लिहिलेला आत्मचरित्रपर मजकूर §इ·स· 1959§ आणि विष्णुभटजी गोडसे यांनी लिहिलेले "माझा प्रवास" मधील आत्मपर अनुभव या सर्व लेखनास आत्मचरित्र ग्रंथ म्हणता आले नाही· तरी ब्रिटिश राजवटीत आत्मचरित्रपर वाङ्मयाची प्रेरणा इंग्रजी वाङ्मयामुळे आपणास मिळाली असे म्हणता येईल·

आपणास ज्यास खरेखुरे आत्मचरित्र म्हणता येईल अशा स्वरूपाचा मराठीतील दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा "आत्मचरित्र" हाच ग्रंथ होय· या ग्रंथाचा लेखनकाळ निश्चित सांगता येत नाही· मात्र या ग्रंथात दादोबांच्या जीवनाचे इ·स· 1847-48 मधील जीवनाची हकीकत आलेली असून ही हकीकत म्हणजे आत्मचरित्र साधा व घरगुती प्रांजळ, निरलुकृंत भाषेमध्ये लिहिलेले असल्यामुळे आत्मगौरव न करता मनामोकळे आत्मनिवेदन केले आहे· हे आत्मचरित्र इ·स· 1885 पर्यंतच्या काळातील सर्वात महत्वाचे आत्मचरित्र होय·

यानंतर दादोबांच्या समकालीन बाबा पद्मंजी यांनी लिहिलेले "अरूणोदय" ऊर्फ "स्वलिखित चरित्र" इ·स· 1887 हा ग्रंथही असाच मनोवेधक आहे·

स्वातंत्र्योत्तर काळात तरूण वर्गात एक निराशेची लाट निर्माण झाली होती· वैकल्य, बेकारी, दारिद्रय, ही बाहय जीवनात होती तर फसवणूक, विश्वासघात इत्यादी-अंतर्जीवनात होती· ध्येयवाद, उत्कट अस्सल प्रेम, मुल्यांची जपणूक या गोष्टी जणू हद्दपार झाल्या· जगायचे कशासाठी ते समजत नव्हते· मरता येत नाही म्हणून जगणे भाग पडत होते· अशा संतप्त क्षुब्ध लेखकांनी लघु नियतकालिके सुरू केली· या लिटल मॅगेझिनमधून मुक्तछंद यामधील बेबंद कविता आपला संताप ओकू लागली· शब्द, वृत्त, व्याकरण यांची बंधने मागेच सुटली होती· आता सुसंगती, औचित्य, सभ्यता यांनाही हद्दपार केले गेले· ही लिटल मॅगेझिनस् पुढे बंद पडली· पण त्या चळवळीतून दोन प्रवृत्ती विकसति झाल्या· नव साहित्यिकांची व दलित जाणिवा असलेल्या साहित्यिकांची दलित कवी म्हणून पुढे ख्यातनाम झालेल्या कित्येक साहित्यिकांचा पहिला हुंकार हा असा प्रकटला·

1· <u>दलित व दलितेतर कवी</u> :-

आपण म्हणत असतो की, लघु अनियकालिकांची लाट ओसरली पण तीमधून काही कवी घडले गेले· जे कवी घडले ते दोन प्रकारचे दलित व दलितेतर दोघांच्यात एक समानता होती· परिस्थिती बद्दल अथवा नियतीबद्दल प्रचंड संताप व त्यासमवेत एक प्रकारचा तुसडेपणा, तुच्छपणा आणि शिवराळपणा या दोन्हीतही समान आहेत· पण दलितेतरांचा संताप हा जितका परिस्थितीजन्य तितकाच अहंकेंद्री व व्यक्तिविशिष्ट होता· त्याला धुमसत राहणे एवढेच कार्य राहिले तर दलित कवींचा संताप हा उघडपणे केवळ व्यक्तिगत न राहता तो व्यापक झाला· दलित कवींच्या संतापाला व्यापक सामाजिक अधिष्ठान लाभले आहे· इ·स· 1950 ते 1960 या काळातच कविमनांचा प्रक्षोभ स्फुट कवितामधून सुटया सुटया रूपाने प्रकट होऊ लागला· इ·स· 1958 च्या डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर हळूहळू या प्रेरणेला सुसंघटित चळवळीचे व त्याव्दारा वाड्मयनिर्मितीचे रूप येऊ लागल्याचे आपणास दिसून येते·

2· **प्रथम कवितेस प्रारंभ :-**

जगातील कोणत्याही वाड्मयाची निर्मिती प्रथम काव्यापासून होत असते हे आपणास माहित आहेच· त्याचप्रमाणे दलित वाड्मयातही प्रथम निर्मिती कवितेची झाली आहे· आपणाला माहित आहे की, आपल्या मनातील उत्कट भावनांचा उत्स्फूर्त उद्रेक होण्यास काव्या इतके दुसरे प्रभावी माध्यम असू शकत नाही· स्वतःला आलेली निराशा, अनुभवलेले अपमान, झालेले विडंबन, सोसाव्या लागलेल्या यातना, वंचना नि विवंचना हे सर्व संवेदन व त्या समवेत येणारा क्रोध कवितामधून शिगोशिग भरून वाहू लागला· दलित वाड्मयातील अधिकतम विद्रोह हा फक्त कवितेतच पहावयास मिळतो· दलित मनाचे ज्वालाग्राही रूप पहावयाचे तर कविता वाचणेच आवश्यक ठरते· संतांनी ओवी हे साधन स्वीकारले तर दलितांना शिवी हेच साधन उरले· काव्याची भाषा, रचना, औचित्य सर्वच बाबतीत दलित कविता निराळी झाली· परमेश्वराला आळवण्यासाठी संतांना ओवी लिहावीशी वाटली तर दलितांना परमेश्वरालाही आईवरून शिवी देण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाही· दलित मनाची व्यथा व्यक्त करणारे अनेक यशस्वी कवी इ·स· 1960 ते 1970 या काळात घडले· किसन फागु बंदसोड हे आद्य दलित कवी होते· वामन कार्डन, अण्णाभाऊ साठे हे आरंभीचे कवी होते· पुढे पुढे खूपच कवी काव्य क्षितिजावर उगवले· रोकडे, वामन निंबाळकर, ज·वि·पवार, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम यांच्या कविता लक्षवेधक आहेत· याच परंपरेत पुढे एसेम अंधेरीकर, अरुण कांबळे, मिठबावकर, शशिकांत लोखंडे, ज्योती लांजेवार या आणि इतर अनेक कवींच्या कविता प्रकाशात आल्या व येत आहेत· स्फुट कविता व तिचे अनेक प्रकार निर्माण झालेच पण शिवाय उत्थान गुंफे सारखी प्रदीर्घ कविताही आज निर्माण झाल्या आहेत हेही आपणास दिसून येते·

3· **दलित कथेस प्रारंभ :-**

दलित कवितेच्या खालोखाल वाचकांचे मन अधिक आकर्षून घेतले ते दलित कथेने· व्यक्तिगत भावनांना काव्याचे माध्यम जितके स्वाभाविक व अपरिहार्य असते·

तितकेच पाहिलेले जग व त्याचे दर्शन घडविण्यास लघुकथेचे माध्यम सोयीचे व सोपे असते· अण्णाभाऊ साठे हे प्रारंभीचे कथा लेखक म्हणावयास हरकत नाही· त्यांच्या लेखणीवर प्रारंभी श्रीपाद महादेव माटे यांच्या शैलीचे संस्कार झाले आहेत· त्यांची कथा थोडी अद्भूतरम्य होऊ पहाते· तथापि, साठे यांनीच दलित मानसिकता असणारी पहिली कथा लिहिली· "वैफल्य" हे तरवारीवरच्या धुळीसारखं असतं नि ती धूळ झटकून तरवार लखलखीत करता येते· हा त्यांचा आशावाद आहे· नागर व ग्रामीण दोन्ही स्तरातील दलित जीवनाची भाषा प्रथम प्रकट करणारे वास्तववादी कथालेख बाबुराव बागुल व शंकरराव खरात हे होत· इ·स· 1959 च्या सुमारास शंकरराव खरातांचा "बारा-बलुतेदार" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला· ज्यांना कसलेच बलुतेही नाही असे वैदू, माकडवाले, बेलदार, नंदीवाले, कैकाडी, डोंबारी, फासेपारधी, वडार, भामटे, लमाण, कोल्हाटी आदींच्या जीवनाचे चित्रण असलेल्या कथांचा संग्रह त्यांनी "तडीपार" या नावाने प्रसिध्द केला· "सांगावा" हा त्यांचाच कथासंग्रह आहे· "जेव्हा मी जात चोरली", "मरण स्वत होत आहे" या कथांनी व कथा संग्रहांनी श्री·बाबुराव बागुल यांनी आपले स्थान स्पष्ट केले आहे· बाबुराव बागुल यांची कथा नुसते भाषा वास्तव उभे करीत नाही ती एक आव्हान देणारी कथा ठरते· मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांची दृष्टी असणारी उदंड सामाजिकता त्यांच्या कथेत आहे· याच यशस्वी कथा लेखनाच्या परंपरेला योगीराज वाघमारे, भीमराव शिरवाळे, पुंडलिक धोंगडे, योगेंद्र मेश्राम, अशोक लोखंडे, अर्जुन डांगळे, अविनाश डोळस, प्रकाश खरात, धर्मराज निमसरकर, भीमसेन देठे, अनिल कांबळे इत्यादी कथाकारांच्या कथांनी दलित कथेस समृध्दता आणली आहे·

4· <u>दलित कादंबरी व नाटकास प्रारंभ :-</u>

"सूड" बाबुराव बागुल, "हकीकत व जटायू" केशव मेश्राम, "फकिरा" अण्णाभाऊ साठे, यांच्या कादंब-या दलित प्रांतात विशेष उल्लेखनीय ठरल्या· व्यापक समाजदर्शन घडविणा-या या कादंब-या आहेत· त्यांचा अपवाद वगळता दलित कादंब-यामध्ये असावी तेवढी वस्तुनिष्ठा किंवा अलिप्तता राहिली नाही· अप्रत्यक्षपणे ती स्वानुभाव तरी प्रकट करते किंवा प्रेम प्रणय यांच्या माध्यमातून स्वप्न सृष्टीत तरी जाते· "हातभट्टी", "गावचा टिनोपाल गुरुजी", "मी मुक्त। मी मुक्त।" या

शंकरराव खरातांच्या कादंब-या जितक्या वास्तव तितक्याच रंजक आहेत. ना.रा.शेंडे यांच्या "गेस्ट हाऊस", "काजळी रात्र", "तांबडा दगड", "विलासिनी", "अन्शुजा" या कादंब-या तसेच ना.ब. जाधव यांची "डॉ.अंजना" ही कादंबरी या व इतर कादंब-या निर्माण झालेल्या आहेत.

सर्वत्र क्रांतीची बीजे पेरण्यासाठी नाटक हा उपयुक्त कलाप्रकार आहे आणि हे दलित लेखकांनाही जाणवले. किसन फागूंच्या "संत चोखामेळा" या नाटकापासून ही सुरूवात होते. प्रभाकर गणवीर, गंगाधर पानतावणे, सुरेश वंजारी, दत्ता भगत, खुशाल कांबळे, कमलाकर डहाट, बाबुराव गायकवाड, श्री. वाकोडे हया नाटककारांची नाटके लक्षात येतात. अलिकडच्या काळात दलित रंगभूमीकडे प्रेक्षकांचे मन खेचून घेण्याचे काम प्रा.दत्ता भगत, प्रेमानंद गजवी, प्रभाकर दुपारे, प्रा.अचलखांब, भि.भि. शिंदे, भीमराव त्रिभुवन, सुरेश मेश्राम यांच्या नाटयकृतींनी केले आहे. प्रेक्षकांमध्ये सवर्णाचा भाग मोठा असल्याने दलित तत्त्वाच्या विचारांचे आव्हान रंगभूमीवरून करणे तसे जड असते. तरीही जलसा, लोकनाटय, नभोनाटय, इंटिमेट थिएटर यांच्या माध्यमातून ही धडपड सुरु असल्याची आपणास दिसून येते.

5. <u>दलित आत्मचरित्र वाङ्मय</u> :-

इ.स. 1960 नंतर मराठी वाङ्मयात दिसणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय. आजपर्यंत पांढरपेशी वर्गाच्या जीवनावर पांढरपेशी लेखकच लेखन करीत होते. पण पुढे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे शिकलेला, तळागाळातला माणूस लेखन करू लागला दीन दलित समाजांच्या व्यथा, वेदनांचे चित्रण होऊ लागले. जन्मामुळे दलित म्हणविणारे लेखक आपल्यावरील अन्याय, अत्याचाराचे चित्रण करू लागले.

आज प्रत्येक माणसाला कमीत कमी एक उत्कृष्ट कादंबरी लिहिता येते व ती म्हणजे "आत्मचरित्र" होय.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही आत्मकथन केले. दलित वाङ्मयाकडे केवळ वाचकानांच नव्हे तर "साहित्य अकादमी" सारख्या संस्थांना व विदेशी भाषिकांनाही लक्ष द्यावे असे वाटण्याइतके प्रचंड यश दलित आत्मचरित्रास

लाभले आहे· त्यामध्ये व्यक्त झालेल्या व्यथा या वास्तवात एका व्यक्तीच्या असल्या तरी लेखनात त्या व्यक्तीच्या न राहता समाजाच्या बनल्या· "दलित स्त्री" चे आत्मकथनामध्ये प्रकटलेले चित्र हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनावा इतके ते वस्तुनिष्ठपण हृदयस्पर्शी बनले·

शंकरराव खरात हे या दलित साहित्याचे मानकरी आहेत· एक थोर विचारवंत, दलित साहित्यकार म्हणून त्यांचा नावलौकिक आहे· शंकरराव खरात हे दलित साहित्याचे मुख्य आधारस्तंभ ठरले गेले आहेत· डॉ·बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचे अभ्यासक आणि पुरस्कर्ते आहेत· त्यांचा जन्म आटपाडी (जिल्हा सांगली) येथील एका अस्पृश्य कुटुंबात झाला· त्यांनी प्राथमिक शिक्षण आटपाडी व औंध येथे घेतले· महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये घेतले· हे शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या "युनियन बोर्डिंग" मध्ये प्रवेश घेतला· त्यांच्या विचाराने ते भारावून गेले· स्वावलंबन व परिश्रम याचे महत्त्व व मोल त्यांनी समजावून घेतले· एल्·एल्·बी· झाल्यानंतर वकिलीचे कामकाज करीत असतानाच डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार करण्याचे कार्य सुरू केले· त्यामुळे एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले· सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी भाग घेतला· "मराठवाडा विद्यापीठाचे" कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली· असा जीवनपटाचा परिचय त्यांनी "तराळ-अंतराळ" या आपल्या आत्मचरित्रामध्ये करून दिला आहे· हे साहित्य व समाज जीवनाचे द्योतक नव्हे काय?

इ·स· 1960 ते इ·स· 1993 या कालखंडातील हा एक बहुचर्चित प्रवाह म्हणजे दलित आत्मचरित्र होय·त्यांच्या वेगवेगळया अनुभव चित्रणांनी त्यांनी वाचकास वेगळ्या जगाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला गेला आहे· इ·स· 1960 नंतर आत्मकथने हा एक नवाच वाड्मयप्रकार निर्माण झाला आहे· हा वाड्मयप्रकार मुख्यतः दलित लेखकांनी निर्माण केला आहे· स्वतःच्या जीवनाची सांधत कालक्रमानुसार संगतवार हकीगत देण्याला हे लेखन बांधलेले नसते· अनुभवलेल्या अर्थपूर्ण संवेदना, वेदना, दुःख, दारिद्र्य, अत्याचार, अन्याय, जातीवाद यांचेच मुख्यतः त्यात प्रतिपादन

केलेले असते· त्यामुळे हे एक श्रेष्ठ ललित गद्य बनले·

माधव कोंडविलकर यांचे "मु·पो· देवाचे गोठणे", दया पवारांचे "बलुतं", आ·लक्ष्मण माने यांचे, "उपरा", उत्तम बंडू तुपे यांचे, "काटयावरची पोटं", प्र·इ· सोनकांबळे यांचे, "आठवणीचे पक्षी", शंकरराव खरात यांचे "तराळ-अंतराळ", लक्ष्मण गायकवाड यांचे "उचल्या", शांताबाई कांबळे यांचे "माझ्या जीवनाची चितर कथा" मल्लिका अमर शेख यांचे "मला उद्ध्वस्त व्हायचय" आत्मचरित्र, शरणकुमार लिंबाळे यांचे, "अक्करमाशी" , प्रा·डॉ· आनंद यादव यांचे "झोंबी" आणि "नांगरणी", डॉ·भीमराव गस्ती यांचे "बेरड" आणि "आक्रोश" इत्यादी आत्मचरित्रे हृदयस्पर्शी आहेत· वाचकाला अंतर्मुख करणारी आहेत· या प्रत्येक लेखकाची शैली प्रभावी आणि परिणामकारक आहे· आपल्या बरोबर वाचकांना त्या वातावरणात नेण्याचे कौशल्य त्यांना चांगलेच साधले आहे·

आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी आत्मचरित्रे लिहिली ती प्रामुख्याने महार, चांभार, कैकाडी व रामोशी अशा उपेक्षित समाजातील ही मंडळी आहेत· पण त्यांची दुःखे मात्र बहुतांशी सारखी आहेत· त्यांचे पहिले दुःख आहे ते न शमणा-या भुकेचे नि दुसरे दुःख आहे ते सदान कदा क्रूर वागणुकीचे विसरल्या जाणा-या माणूसपणाचे तसेच दलितांच्या जीवनातील दारूचे महत्त्वपूर्ण स्थान, भूताखेतावरचा जबरदस्त विश्वास, स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू समजून स्वतःची बायको गहाण ठेवण्यापर्यंत मजल गेलेली असे हे सगळेच वेदना वाङ्मय म्हणजे ही आत्मचरित्रे आहेत·

दलित बोलू लागले, लिहू लागले ही मोठी स्पृहणीय गोष्ट आहे· उत्तम बंडू तुपे यांचे "काटयावरीच पोटं" ही छोटेखानी आत्मचरित्र उत्कट व प्रांजळ आहे· त्यांचा दलितांचा पिंड, प्रकृती हे प्रारंभापासून शेवटच्या पानापर्यंत दिसते· उत्तम बंडू तुपेही आजही परिस्थितीने सामान्यच राहिले आहेत· पण त्याची त्यांना खंत नाही· त्यामुळे त्यांच्या वर्तनात आपोआपच कणखर पणाचा एक डौल आलेला आहे· ते 'बन चुके' नाहीत· त्यांच्या आविष्कारात एक परखडपणा आणि मोहक असा बेगुमानपणा आहे· म्हणून त्यांचे लेखन हृदयाला जाऊन भिडते·[2]

आ· लक्ष्मण बापू माने यांचे "उपरा" हे अतिशय प्रभावी लेखन आहे· या पुस्तकास खूपच प्रसिध्दी मिळाली आहे· या पुस्तकात त्यांनी एका माणसाच्या वाटयाला आलेला भोगवटा चित्रित केला आहे· त्यातील प्रसंग संघर्षपूर्ण आहेत· भाषा जोरकस आहे· पण काही ठिकाणी "उपरा" चे संपूर्ण रूप पाहिल्यावर असे वाटते की, आपली दुःख मांडताना त्यांना समाजाकडून जोगवा नको आहे· त्यांना हवे आहे ते समत्व, स्थापनेसाठी आत्म सन्मानाने जगण्यासाठी सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे· "उपरा" मधून कैकाडी समाजाच्या दुःखाचे देखील चित्रण होऊ शकते· या "उपरा" मुळे कैकाडी समाज झोतात आला·

दगडू मारूती पवार (दया पवार) यांचे "बलुतं" हे लेखनही प्रभावी आहे· मात्र दया पवारांची कृती आणि लेखन यातून त्यांनी पत्नीविषयक जे चित्रण केले आहे· त्यातून ते पत्नीला आणि एकूण त्या प्रसंग चित्रणाला न्याय देऊ शकले नाहीत·

शंकरराव खरातांचे "तराळ अंतराळ" हे लेखन त्यांनी आपल्या वृत्तीला अनुसरून ऋतू सौम्य भावनेने लिहिले आहे· त्यांच्याकडून स्फोटक, आक्रमक असे काही लिहिले गेले नाही· पण तरीही त्यांचे कथन उत्कट व हृदयस्पर्शी आहे·

माधव कोंडविलकरांचे "मु·पो· देवाचे गोठणे" यातील लेखनही अनेक गुणांनी संपन्न आहे· आपला कोंडमारा, साहित्याची ओढ त्यांनी उत्कटपणे चित्रित केली आहे·

प्र·ई सोनकांबळे यांचे "आठवणीचे पक्षी" यातील लेखन कमालीचे, अकृत्रिम आणि उत्कट आहे· अर्थात त्यात प्रामुख्याने बालवय व युवावस्थेतील अनुभवी चित्रण आहे· एका निरागस, लाघवीपण जिद्दी मुलाच्या भावना त्यांनी मोठया सहजतेने व्यक्त केल्या आहेत·

मल्लिका अमरशेख यांच्या "मला उद्ध्वस्त व्हायचंय" या आत्मचरित्रात छळाची आणखी एक त-हा वाचायला मिळते· लग्नप्रसंगी नामदेव ढसाळ व मल्लिका

यांनी घेतलेल्या आणाभाका पण लग्नानंतर सगळे विसरून त्यांनी केलेली मल्लिकेबरोबरची वागणूक आपल्याला उद्ध्वस्त करते·[3]

लक्ष्मण गायकवाड यांच्या "उचल्या" या आत्मचरित्रात भटक्यांच्या जीवन व्यथा आपल्या हृदयाला भिडणा-या आहेत· तसेच यात स्त्रियांनी देखील आत्मचरित्रे लिहिली· शांताबाई कांबळे यांनी आपल्या "माझ्याजीवनाची चितरकथा" या आत्मचरित्रामध्ये आपल्या वाटेला आलेले भोग चित्रित केला आहे·

डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड" आणि "आक्रोश" आत्मचरित्रामध्ये त्यांनी आपल्या जीवनात खूप भोगले, पाहिले आणि अनुभवले ते जसेच्या तसेच त्यांनी आपल्या "बेरड" या पूर्वार्ध आत्मचरित्रात लिहिले आहे· ते जातीने रामोशी समाजाचे असून रामोशी समाजाला भोगाव्या लागणा-या वेदना, दुःख, दारिद्र्य, पोलीस खात्याकडून होणारे छळ, प्रस्थापित वर्गाकडून होणारी उपेक्षा याचे चित्रण हृदयस्पर्शी केले आहे·

"आक्रोश" या आत्मचरित्रात त्यांची चळवळ इ·स· 1974 सालच्या सुरूवातीलाच सुरू झाली होती· एकीकडे पोटाची चिंता, दुस-या बाजूने पोलीस खात्याकडून होणारे अमानुष छळ, तिस-या बाजूने प्रस्थापित वर्गाकडून होणारी उपेक्षा, अत्याचार आणि आपल्याच स्वकीय जात बांधवाकडून होणारे हिंस्त्र छळ, शोषण या सर्वांना तोंड देत त्यांच्या अज्ञानी लोकांनी चळवळ केली· प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना संघर्ष करावा लागला· आक्रोश करावा लागला· तेव्हा कुठे शासनाचे बंदिस्त दरवाजे उघडले गेले आहेत· पण यासाठी तब्बल आठरा वर्षे अविश्रांतपणे झगडावे लागले· इत्यादीचे चित्रण "आक्रोश" या आत्मचरित्रामध्ये केलेले आहे· यातील प्रसंग हृदयाला भिडणारे आहेत·

6· चरित्र आत्मचरित्र :-

चरित्र वस्तूनिष्ठ (Objective) तर आत्मचरित्र आत्मनिष्ठ (Subjective) आत्मचरित्र म्हणजे स्वतःनेच स्वतःचा गतकाळाचा लिहिलेला नुसता इतिहास नव्हे तर स्वतःच्या गतकाळाचे सिंहावलोकन· विश्लेषण आणि आत्मनिरीक्षण करून लिहिलेला अन्वर्थक इतिहास· चरित्र व आत्मचरित्र ही जुळी भावंडे आहेत· कारण सत्य कथनाबाबत

ती समानधर्मी आहेत· आत्मचरित्र केवळ "स्व" भोवतीच केंद्रीत असू शकत नाही· "स्व" भोवती असणारे आप्तेष्ट जिवलग मित्र, सख्य-संबंधी आणि हितशत्रू यांची देखील त्यात महत्वपूर्ण गुंतवणूक असते·

Every man's life should be best written by himself असे डॉ·जॉन्सनने एकदा म्हटले होते ते केवळ सत्याच्याच आग्रहासाठी· आत्मचरित्र लिहिणे ही एक तारेवरची कसरत आहे हे खरेच आहे·

प्रांजळपणा, मनोविश्लेषण ज्ञान इत्यादी गुण असूनही लेखकाने स्वतःच्या चरित्राची जर कलात्मक मांडणी केली नाही तर ते आत्मचरित्र मनोवेधक ठरणार नाही· आणि मनोवेधकतेच्या अभावी आत्मचरित्र या वाड्मय प्रकाराला सहृदय वाचकांच्या दृष्टीने विशेष महत्व उरणार नाही·

7· स्त्रियांची आत्मचरित्रे :-

इ·स· 1900 ते इ·स· 1960 या कालखंडात प्रसिध्द झालेल्या आत्मचरित्रांची संख्या सुमारे शंभराच्या आसपास आढळते· नंतर इ·स· 1960 ते इ·स· 1993 या कालावधीत प्रसिध्द झालेल्या आत्मचरित्रांची संख्या सुमारे दोनशे आहे· पण आत्मचरित्र या वाड्मय प्रकारात गुणात्मक वाढ मात्र अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही· इ·स· 1960 नंतर महाराष्ट्रात ज्या वाड्मयीन आणि सामाजिक चळवळी उदयाला आल्या त्यातून वेगवेगळ्या त-हेचे आत्मचरित्रात्मक लेखन लिहिले गेले·

आपण जर आत्मचरित्राच्या दृष्टीने बघितले तर नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम व बहिणाबाई वगैरेंच्या आत्मचरित्रपर उल्लेख आढळत असले तरी ती जाणिवपूर्वक लिहिलेली आत्मचरित्रे नाहीत· इंग्रजी कालखंडापूर्वी दादोबा पांडुरंग, निरंजन माधव, नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, बापू काळे यांची आत्मचरित्रे प्रसिध्द झाली आहेत·

स्त्रियांनी देखील याच कालखंडात काही आत्मचरित्रे लिहिलेली आहेत· त्यामुळे आत्मचरित्रात्मक वाड्मयास एक वेगळी कलाटणी मिळाली आहे· रमाबाई

रानडेयांनी "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" लिहून चालू केलेला हा प्रवाह पुढे अधिक फोफावलेला आपणास दिसतो. पतीपत्नींचा एकमेकाकडे बघण्याचा दृष्टीकोण यातून समजतो. काही प्रसिध्द व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वाच्या अबोधकडा हातात येतात.

"स्मृति तरंग" अन्नपूर्णाबाई रानडे, "या सदाशिव" इंदिरा भागवत, "माझा नंदादीप" लक्ष्मीबाई पटवर्धन, "वेचलेले मणी", रमाबाई केदार, "ढळला रे ढळला दिन सख्या", राधाबाई आपटे, "मीच हे सांगितले पाहिजे", शीलवती केतकर,"मी आणि बालकवी",पार्वतीबाई ठोंबरे ही या काळातील आत्मचरित्रे. यातील शीलवतीबाई व बालकवींची पत्नी पार्वतीबाई सोडल्या तर इतर सर्व स्त्रिया अप्रसिध्द आहेत.

इ.स. 1934 मध्ये लक्ष्मीबाई टिळकांनी "स्मृतिचित्रे" टिळकांचे चरित्र लिहिण्याच्या हेतूने लिहिले गेलेले हे आत्मचरित्र मराठी वाङ्‌मयात अमरस्थान पटकावून बसले आहे.

इ.स. 1944 मध्ये लिहिलेले "माझे पुराण" हे आनंदीबाई कर्वे यांचे हे आत्मचरित्र बायांच्या निःसंकोचपणाने आणि प्रांजळपणाने केलेल्या निवेदनामुळे विलक्षण आकर्षक आहे.

लीलबाई पटवर्धन यांच्या "आमची आकरा वर्षे" इ.स. 1945 मध्ये लिहिलेल्या आत्मकथनाचे स्वरूप मात्र काहीसे निराळे आहे. इ.स. 1950 पर्यंत स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे विपूल प्रमाणात नाहीत. पण "स्मृतिचित्रे" हे मराठी साहित्याचे अहेव लेणे ठरते आहे. तसेच अन्नपूर्णाबाई रानडे यांचे "स्मृति तरंग" व इंदीराबाई भागवत यांचे "या सदाशिव" ही आत्मचरित्रे याच कालखंडातील आहेत. जवळ जवळ दीडशे वर्षात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या फारच अल्प आहे. पत्नीने कथन केलेल्या पतीच्या कडू गोड आठवणी असाच आत्मकथनांचा घाट आहे. पत्नीच्या दृष्टीकोणातून त्यांची भूमिका भक्ताची दिसते. आपला जन्मच पति सुखासाठीच आहे. अशी त्यांची पक्की धारणा होती. त्यामुळे ती बहुतेक निखळ पति स्त्रोत्रे आहेत. अशा स्वरूपाची स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत.[4]

या कालखंडात संख्येने विपुल आत्मचरित्रे लिहिलेली आढळतात· करमणूक व्हावी, आपले अनुभव दुस-याला सांगावे, आत्मशोध घ्यावा,आत्मस्तोत्र गावे, आपल्या संबंधीचे जनमानसातील गैरसमज दूर करावे, पुढच्या पिढीला मार्गदर्शक व्हावे अशा विविध प्रवृत्तीतून जन्मलेल्या आत्मचरित्रांनी आपले काही ठळक प्रवाह निर्माण केले आहेत· त्यातूनच दलित आत्मचरित्र हा एक प्रवाह निर्माण झाला आहे· त्यामुळे दलित आत्मचरित्राने आत्मचरित्रात्मक वाड्मयात महत्वाची भर टाकली आहे· या संदर्भात डॉ·भीमराव गस्ती यांच्या आत्मचरित्रपर वाड्मयांचा अलिकडच्या काळातील दलित आत्मकथनास गती देण्याचा प्रयत्न निश्चितच गौरवास्पद आहे· त्यांच्या लेखनामुळे दलित आत्मचरित्र कथनपर वाड्मयाची वाड्मयीन गुणवत्ता वाढलेली वास्तव जीवन दर्शन त्यांच्या लेखनातून कसे घडते आहे ते सोदाहरण दाखवून देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे·

## संदर्भ सूची

1· आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन (1800 ते 1975)
संपादक : प्रा· देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 214
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·

2· आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन (1800 ते 1975)
संपादक : प्रा· देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 217
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·

3· आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन (1800 ते 1975)
संपादक : प्रा· देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 229
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·

4· आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन (1800 ते 1975)
संपादक : प्रा· देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 221
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·